-: प्रेसनोट :- दिनांक : १६/०८/२०२१

**यातील फिर्यादी यांचे आधीचे मंजुर व सध्यस्थीतीत प्रलंबित बिलांची रक्कम रिलीज (अदा) करणे साठी यातील आरोपी लोकसेवक यांनी स्वत:करीता रू. २०,००,०००/- लाचेची मागणी करून ति मिळविण्याचा प्रयत्न केला.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३५ /२०२१ |
| कलम | कलम-७ भ्र.प्र.कायदा १९८८ |
| आरोपी इसम | डॉ. डि.एल.एन.मुर्ती, चिफ ऑपरेटींग ऑफीसर, मुंबई मोनोरेल, मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये २०,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेचीरक्कम | - |
| थोडक्यात माहीती | यातील फिर्यादी यांची फॅसीलीटी मॅनेजमेंटची कंपनी असुन, नमुद कंपनीला **Mumbai Monorail** या प्रकल्पाअंतर्गत साफसफाई, हाउसकिपींग, मेंटनन्स, कस्टमर सर्व्हिस असोशीएट संबधाने, जानेवारी २०१९ ते ऑगस्ट २०२० पर्यतचे कंत्राट मिळालेले होते, सदरचे काम त्यांनी ऑगस्ट २०२० रोजी कंत्राटाप्रमाणे पुर्ण केले असुन, नमुद कामाचे देयक (बिल/पेमेंट) दोन करोड पन्नास लाख (२.५ करोड) व ३२ लाख बॅक गॅरन्टी असे कंपनीस मिळणे प्रलंबित होत, वारंवार प्रयत्न करून माहे फेब्रुवारी-मार्च २०२१ मध्ये त्यांचे कंपनीस रूपये २ करोड १० लाखाचे देयक (बिल/पेमेंट) व माहे जुन २०२१ मध्ये २२ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम असे **Mumbai Monorail** तर्फे रिलीज (अदा) करण्यात आली होती. परंतु अदयाप ४० लाख रूपयाचे देयक (बिल/पेमेंट) व ११ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम **Mumbai Monorail** कडे प्रलंबित आहे.<br><br>उपरोक्त माहे फेब्रुवारी-मार्च २०२१ मध्ये रिलीज केलेल्या रूपये २ करोड १० लाखाचे देयक (बिल/पेमेंट) व २२ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम तसेच सध्यस्थितीत प्रलंबित ४० लाख रूपयाचे देयक (बिल/पेमेंट) व ११ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम रिलीज करणे साठी डॉ. डि.एल.एन.मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर(COO) **Mumbai Monorail** यांनी लाच मिळविण्यासाठी फिर्यादी यांचे पेमेंटची फाईल स्वत:कडे अडकवुण ठेवुण, २० लाख रूपये लाचेची मागणी करून, लाच मिळविण्या करीता अप्रमाणीकपणे प्रयत्न केले असल्याचे दिनांक ०२/०७/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत निष्पन्न झालेने त्यांचे विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

अलकादेशमुख १६।८

**( अलका देशमुख )**
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट:- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB.